पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८
मा. अ प्रभाग समिती
कार्यपत्रिका क्रमांक १
सभावृत्तांत

दिनांक – १०/०४/२०१५ वेळ : सकाळी १०.३०

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या “अ” प्रभाग समितीची विशेष सभा शुक्रवार दि.१०/०४/२०१५ रोजी सकाळी १०.३० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील मा.महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात श्री.ओमप्रकाश बकोरिया, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर पुणे यांचे अध्यक्षतेखाली आयोजीत करण्यात आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा.श्री. जगदिश शेट्टी
२. मा.बाबर शारदा प्रकाश
३. मा.उल्हास शेट्टी
४. मा.भारती फरांदे
५. मा.आर.एस.कुमार
६. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
७. मा.राजू मिसाळ
८. मा.नेटके सुमन राजेंद्र
९. मा.सौ. काळभोर वैशाली जालिंदर
१०. मा.सौ. साळुंके सविता सुरेश

याशिवाय श्री.प्र.श. खांडकेकर, क्षेत्रीय अधिकारी, अ क्षेत्रीय कार्यालय, श्री.पी.जी.जाधव, प्र.प्रशासन अधिकारी तथा लेखाधिकारी, अ क्षेत्रीय कार्यालय हे उपस्थित होते.

| | |
|---|---|
| अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त :<br>पुणे महानगरपालिका<br>**(पिठासीन अधिकारी)** | सन्मा.सदस्य, क्षेत्रीय अधिकारी, उपस्थित सर्व अधिकारी यांचे स्वागत करतो. आजच्या सभेत मा.अ प्रभाग समितीचे सभापती पदावर नेमणूक करणेचा विषय आहे. त्यासाठी मा.विभागीय आयुक्त यांनी सभेचा पिठासीन अधिकारी म्हणून माझी या ठिकाणी नेमणूक केलेली आहे. मा. अ प्रभाग समितीच्या सभापती पदाची निवडणूक मुक्त व निर्भयपणे पार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेणेबरोबरच त्या कामकाजाची व्हिडिओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवणेत आलेली आहे.<br>**सचिव यांनी सभेचे कामकाज सुरु करावे अशी सूचना करतो.** |

**प्रशासन अधिकारी तथा सचिव ( सभाशाखा)** : “अ” प्रभाग समितीचे सभापती पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २९ अ (४) नुसार नेमणुक करणेकामी एकच नामनिर्देशन पत्र मुदतीत दाखल झालेले आहे. त्यामधील उमेदवार, त्यांचे सूचक व अनुमोदक यांची नावे पुढीलप्रमाणे.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | सुचकाचे नाव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|---|
| १. | काळभोर वैशाली जालिंदर | सौ.साळुंके सविता सुरेश | राजू मिसाळ |

प्रशासन अधिकारी तथा सचिव ( सभा शाखा) यांनी प्राप्त झालेले उपरोक्त नामनिर्देशन पत्र पिठासीन अधिकारी यांचेकडे सुपुर्त केले. पिठासीन अधिकारी यांनी नामनिर्देशन पत्रांची छाननी केली.

अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त : पुणे महानगरपालिका **(पिठासीन अधिकारी)**

“अ” प्रभाग समिती सभापती पदासाठी मुदतीत प्राप्त झालेल्या उपरोक्त उमेदवाराच्या नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्यात आली असून नामनिर्देशन पत्र वैध ठरविण्यात आले आहे.
त्यामध्ये “अ” प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणाऱ्या काळभोर वैशाली जालिंदर या एकच वैधरित्या नामनिर्देशित उमेदवार आहेत.

उमेदवारास १५ मिनिटांच्या आत त्यांनी सही केलेली लेखी नोटीस पिठासीन अधिकारी यांचेकडे देवुन त्यांची उमेदवारी मागे घेता येईल.

(पिठासीन अधिकारी यांनी उमेदवारी मागे घेण्यासाठी १० .३५ ते १०.५० हा १५ मिनिटांचा कालावधी दिला.)

उमेदवारी मागे घेण्यासाठी दिलेल्या १५ मिनिटांच्या कालावधीमध्ये उमेदवाराने उमेदवारी माघारीचा अर्ज दिला नाही.

ठराव क्रमांक – १ विषय क्रमांक – १

दिनांक – १०/०४/२०१५ विभाग – प्रशासन

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समिती सभापती पदासाठी निवडणूक लढविणाऱ्या श्रीमती काळभोर वैशाली जालिंदर या एकच वैधरित्या नामनिर्देशित उमेदवार असल्याने

श्रीमती काळभोर वैशाली जालिंदर यांची अ प्रभाग समितीचे सभापती पदावर बिनविरोध निवड झाल्याचे जाहिर करणेत येत आहे.

**सही/-**
**(ओमप्रकाश बकोरिया)**
पिठासीन अधिकारी तथा
अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त,
पुणे महानगरपालिका

(श्रीमती. काळभोर वैशाली जालिंदर यांनी सभेच अध्यक्षस्थान स्विकारले)

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : २ | विषय क्रमांक | : २ |
| दिनांक | : १०/०४/२०१५ | विभाग | : प्रशासन |
| सुचक | : मा. उल्हास शेट्टी | अनुमोदक | : मा. नेटके सुमन राजेंद्र |

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची मासिक सभा प्रत्येक महिन्याचे दुसऱ्या बुधवारी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

यानंतर मा.अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
(वैशाली जा.काळभोर)
अध्यक्षा
अ प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ क्षेत्रीय कार्यालय, निगडी ४४
क्रमांक : अक्षेका/११/कावि/ ८९ /२०१५
दिनांक : १०/०४/२०१५

**सही/-**
**प्रशासन अधिकारी**
तथा सचिव (सभा शाखा)
अ प्रभाग समिती